प्रति,

मा. स्मिता आपटे, पंख अध्यक्षा,
कोथरूड पुणे यांस...

विषय :- २६ जून रोजी “जागतिक अंमली पदार्थ विरोधी जनजागृती दिन” साजरा केले बाबत...

--------o---o---o------

दिनांक २६/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० वा दरम्यान खडक पोलीस स्टेशन हददीतील श्री शिवाजी मराठा हायसकुल व कनिष्ठ महाविदयालय शुक्रवारपेठ पुणे येथे खडक पोलीस स्टेशन, पंख संस्था व क्युकहिल फाऊडेंशन यांचे विदयमाने “जागतिक अंमली पदार्थ विरोधी जनजागृती दिना” निमित्त शालेय विदयार्थी व शिक्षक यांना अंमली पदार्थ विषयी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये अंमली पदार्थ सेवनामुळे होणारे दुष्परिणाम या विषयी पोलीस निरीक्षक गुन्हे श्री उत्तम चक्रे, पोउप निरी श्री मिसाळ खडक पोलीस स्टेशन व पंख संस्थेच्यावतीने स्मिता आपटे व त्यांचे सहकारी यांनी उपस्थितीत विदयार्थी मुलांना माहिती सांगुन अनेक प्रकारच्या व्यसनापासुन दुर राहण्याचे तसेच व्यसनामुळे काय दुष्परिणाम होतात या बाबतचे मार्गदर्शन करुन त्यावरिल शॅार्टफिल्म दाखविण्यात आली. सदर वेळी १२० ते १५० विदयार्थी व शिक्षक वर्ग उपस्थितीत होते.

आपले संस्थेने दिनांक २६/०६/२०१९ रोजी “जागतिक अंमली पदार्थ विरोधी जनजागृती दिना” निमित्त केलेला कार्यक्रम अतिशय उल्लेखनिय व प्रभावि तसेच मुलांचे मनपरीवर्तन करण्यास साहय करणारा कार्यक्रम होता.तरी खडक पोलीस स्टेशन हद्दित असेच कार्यक्रम आपले संस्थेतर्फे सादर करण्यात यावेत. आपले संस्थेच्या कार्यक्रमास आमचे सहकार्य असेल.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक ★ खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर ★

कळावे

दि. ३०/६/२०१९

(उत्तम चक्रे)
पोलीस निरीक्षक,(गुन्हे),
खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर